**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत जाँच फार्म -I)**

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District** (जिल्हा)पुणे शहर **P.S.(ठाणे):** बंडगार्डन **Year (वर्ष):** 2019

**FIR No.**(प्रथम खबर 0003 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 03/01/2019 02:24 बजे

**2.**

| **S.No.** (अ.क्र.) | **Acts** (अधिनियम) | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

**1. Day** बुधवार **Date From (दिनांक** 02/01/2019 **Date To ( दिनांक पर्यंत):**02/01/2019

**Time Period** (कालावधी): पहर 6 **Time From** 16:58 बजे **Time To (वेळेपर्यंत):** 16:58 बजे

**(b) Information received at P.S.** (माहिती मिळालेले **Date (दिनांक ):** 03/01/2019 **Time (वेळ):** 02:15 बजे

**(c) General Diary Reference** (रोजनामचा **Entry No. (नोंद क्र.):** 003 **Date & Time (दिनांक आणि वेळ)**03/01/2019 02:15 बजे

**4. Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

**5. Place of Occurrence** (घटनास्थळ):

**1. (a) Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशाउत्तर, 0.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address** (पत्ता):ससुन पास केंद्र,ससुन हॉस्पिटल ,पुणे शहर

**(c) In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर
**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे **District(State) (जिल्हा**

**6. Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

**(a) Name** (नाव): अर्चना पंढरीनाथ दौंडकर

**(b) Father's/Husband's Name**(वडील / पती का नाव) :

**(c) Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1988 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):**भारत

**(e) UID No.** (यु.आय.डी.

**(f) Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (अदा केल्याची

**Place of Issue** (अदा केल्याची ठिकाण):

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving**

| **S.No.**(अ.क्र.) | **Id Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **Id Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address** (पत्ता):

| **S.No.**(अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address (पत्ता)** |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभा,पुणे शहर,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभा,पुणे शहर,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation** (व्यवसाय):

**(j) Phone number** (फोन नं.): **Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.**(अ. | **Name** (नाव) | **Alias (उर्फनाव)** | **Relative's Name (नातेवाईकाचे** | **Present Address (वर्तमान पत्ता)** |
|---|---|---|---|---|
| 1 | महेश आनंद आजेगावकर | | | 1. डी 103राधिका हॉसिंग सोसायटी,सिंहगड रोड,पुणे शहर,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):



Scanned by CamScanner

फिर्याद दिनांक ०३/०१/२०१९

मी अर्चना पंढरीनाथ दौंडकर, वय ३१ वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे. समक्ष सरकारतर्फे फिर्याद देते की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे जुन २०१६ पासून नेमणुकीस आहे.

आज दिनांक ०२/०१/२०१९ रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयात हजर असताना, मा संदीप दिवाण, पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी आम्हांस त्यांचे कार्यालयात बोलावून सांगितले की, तक्रारदार अक्षय सदाशिव कांबळे, यांची ससुन हॉस्पिटलमधील जन्म-मृत्यु नोदणी कार्यालयातील कर्मचा-या विरुध्द लाचेच्या मागणीची तक्रार असुन त्यांची सविस्तर लेखी तक्रार घेवुन पुढील योग्यती कारवाई करावी. त्यानुसार आम्ही तक्रारदार श्री. कांबळे यांना आमचे कार्यालया मध्ये घेवुन येवुन त्यांचे नाव पत्ता विचारता त्यांनी त्यांचे नाव श्री. अक्षय सदाशिव कांबळे, रा. मु.पो. थेऊर (कुंजीरवस्ती), ता. हवेली, जि. पुणे असे सांगुन त्यांनी त्यांची ससुन हॉस्पिटलमधील जन्म मृत्यु नोदणी कार्यालयातील कर्मचा-याविरुध्द तक्रार दिली. सदर तक्रारीबाबत माहिती खालीलप्रमाणे -

तक्रारदार यांचे वडील कै. सदाशिव बबन कांबळे यांचे दिनांक २३/१२/२०१८ रोजी ससुन हॉस्पीटल पुणे येथे अल्पशा आजाराने निधन झाले होते. त्यांचे वडिलांचा मृत्युचा दाखला बॅकमध्ये तसेच तक्रारदार यांच्या वडिलोपार्जित शेतीत वडिलांचे नाव कमी करुन वारसदारांची नावे लावण्यासाठी मृत्युच्या दाखल्याची गरज असल्याने त्यांनी क्षेत्रीय कार्यालय हडपसर तसेच क्षेत्रीय कार्यालय कसबा पेठ या ठिकाणी गेले होते. त्यावेळी तेथे तक्रारदार यांना सांगितले की, ससुन हॉस्पीटलमधील जन्म-मृत्यु नोंदणी कार्यालयातुन मृत्युची नोंद झालेली नाही. त्यामुळे तक्रारदार व त्यांचा मित्र गोपाल नाथा जाधव, ससुन हॉस्पीटल येथील जन्म-मृत्यु नोंदणी कार्यालयात दिनांक ०२/०१/२०१९ रोजी गेले असता तेथील कर्मचाऱ्याने तक्रारदार यांचे मृत्युचा दाखला देण्यासाठी एक हजार रुपये लाचेची मागणी केली व पैसे लगेच आणुस देण्यास सांगितले.

त्यामुळे ससुन हॉस्पीटल येथील जन्म-मृत्यु नोंदणी कार्यालयातील कर्मचारी हे तक्रारदार यांचे वडिलांचा मृत्युचा दाखला देण्यासाठी त्यांचेकडे मागत असलेली एक हजार रुपये ही लाच रक्कम असल्याबाबत त्यांची खात्री झाल्याने त्यांनी सदर कर्मचारी यांच्यावर योग्य ती कारवाई करावी अशी तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने गोपनिय कामकाजासाठी सार्वजनिक बांधकाम विभागातील खालील पंच साक्षीदार यांची नामे १) श्री सुनिल महादेव कामथे, वय ४५, कनिष्ठ लिपीक, २ ) श्री. मनोजकुमार रामराव वाठोरे, वय ३९, सहायक भंडारपाल, यांची सेवा उपलब्ध करुन घेतली.

त्यानंतर आज दिनांक ०२/०१/२०१९ रोजी तक्रारदार श्री. अक्षय कांबळे व पंच साक्षीदार श्री. कामथे यांना लोकसेवक कर्मचा-याचे कार्यालयात, जन्म मृत्यु दाखला नोंदणी कार्यालय, ससुन हॉस्पिटल, पुणे येथे पाठवुन पडताळणी कारवाई करणेत आली. पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री. महेश, कर्मचारी, जन्म मृत्यु नोंदणी कार्यालय, ससुन हॉस्पिटल यांनी पंचा समक्ष तक्रारदार श्री. कांबळे यांच्याकडे त्यांचे वडिलांचा मृत्युचा दाखला देण्यासाठी पाचशे रुपये दे असे म्हणुन लाचेची मागणी केली, तसेच नंतर आठशे रुपयांची लाचेची मागणी केली. परंतु नंतर पुन्हा तक्रारदार यांनी आता पाचशे रुपये देतो, नंतर .. असे म्हणाले तसेच तक्रारदार यांनी माझे एटीएम एक्सपायर झाले आहे असे म्हणुन भाऊ घेऊन आला की घेऊन येतो असे म्हणाले असता त्यावेळी सदरचे लोकसेवक श्री. महेश आनंद जातेगांवकर, वय ४३ वर्षे, शिपाई, आरोग्य विभाग (जन्म मृत्यु

अर्चना दौंडकर
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे

Scanned by CamScanner

**पुरवणी पान नं. १ – दिनांक ०३/०१/२०१८ रोजीचे अर्चना पंढरीनाथ दौंडकर यांचे फिर्यादी लगतचे असे.**

---

कार्यालय), पुणे महानगरपालिका, पुणे यांनी मान हलवुन होकार दिल्याने सापळा कारवाई लगेचच करण्याचे ठरले.

त्यानुसार तक्रारदार श्री. कांबळे यांनी ससुन हॉस्पिटल मधील जन्म मृत्यु नोदणी कार्यालयातील कर्मचारी श्री. महेश आनंद जातेगांवकर, शिपाई, आरोग्य विभाग (जन्म मृत्यु कार्यालय), पुणे महानगरपालिका, पुणे यांना लाच म्हणुन देणेसाठी आणलेली रोख रक्कम ५००/- रु. ची नोट आमचे व पंचाचे समक्ष हजर केली. या नोटेस अ‍ॅन्थ्रॉसिन पावडर लावण्याचा व त्याचे गुणधर्म समजावुन सांगण्याचा सापळापुर्व पंचनामा लाचलुचपत प्रतिबधंक विभाग, पुणे कार्यालयातच करण्यात आला आहे. सपोआ भापकर यांना मदतीसाठी दिले.

पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक ससुन हॉस्पिटल मधील जन्म मृत्यु नोदणी कार्यालयातील कर्मचारी श्री. महेश आनंद जातेगांवकर यांनी तक्रारदार श्री. कांबळे यांना लाच रक्कम घेवुन ससुन हॉस्पिटल येथिल जन्म मृत्यु दाखल नोंद विभाग येथे बोलाविले असल्याने त्याप्रमाणे तक्रारदार श्री. कांबळे, दोन्ही पंच साक्षीदार, सर्व सापळा पथक असे ससुन हॉस्पिटल, जन्म मृत्यु नोंद विभाग, कार्यालय, पुणे येथे जावुन सापळा कारवाईचे आयोजन करण्यात आले. सापळा कारवाई दरम्यान जन्म मृत्यु नोंद विभाग, ससुन हॉस्पिटल, पुणे येथे श्री. महेश आनंद जातेगांवकर, वय ४३ वर्षे, व्यवसाय - नोकरी, शिपाई, आरोग्य विभाग (जन्म मृत्यु कार्यालय), पुणे महानगरपालिका, पुणे रा. डी/१०३, राधिका हौसिंग सोसायटी, सिंहगड रोड, पुणे यांनी तकारदार यांचेकडुन लाच रक्कम ५००/- रु. त्यांचे रुममधील भिंतीस असलेले गणपती मुर्तीचे समोर ठेवणेस सांगितली, त्यानंतर त्यांना पंचासमक्ष असता पकडण्यात आले. ती वेळ दुपारी १६.५८ वा. ची होती. श्री. महेश जातेगावकर यांना आम्ही आमची ओळख सांगुन त्यांना त्यांचे नाव पत्ता विचारता त्यांनी आपले नाव महेश आनंद जातेगावकर, वय ४३, शिपाई, जन्म मृत्यु नोंदणी कार्यालय, आरोग्य विभाग, महानगरपालिका, पुणे, रा. डी/१०३, राधिकाहौसिंग सोसायटी, विठ्ठलवाडी जकात नाक्याजवळ, सिहंगड रोड, पुणे असे सांगितले. त्यानंतर श्री. जातेगावकर यांचेकडुन लाच रक्कम पंचासमक्ष हस्तगत करण्यात आली असून, पंचनाम्यादरम्यान लाच रक्कम आवश्यक मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर कारवाई बाबत घटनाक्रमाप्रमाणे सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व सापळा पंचनामा करण्यात आला असुन पडताळणी व सापळा कारवाई दरम्यानचे तक्रारदार व लोकसेवक श्री. महेश जातेगावकर यांचेतील ध्वनिमुद्रीत झालेल्या संभाषणाची स्क्रिप्ट करण्यात आली.

एकंदरीत तक्रारदार यांची दि. ०२/०१/२०१९ रोजीची मुळ तक्रार त्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०२/०१/२०१९ रोजी पंचासमक्ष करण्यात आलेली पडताळणी आणि सापळा कारवाई यादरम्यान घडलेल्या घटना, तसेच प्रत्यक्ष व ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण यावरून तक्रारदार श्री. कांबळे यांच्याकडे त्यांचे वडिलांचा मृत्युचा दाखला देणेसाठी श्री. महेश आनंद जातेगांवकर, वय ४३ वर्षे, व्यवसाय - नोकरी, शिपाई, आरोग्य विभाग (जन्म मृत्यु कार्यालय), पुणे महानगरपालिका, पुणे रा. डी/१०३, राधिका हौसिंग सोसायटी, सिंहगड रोड, पुणे यांनी स्वतःचे पदाचा गैरवापर करुन तक्रारदार यांचेकडे रु. ८००/- ची लाचेची मागणी करुन कायदेशीर परिश्रमिकाखेरीज अन्य परितोषण म्हणून दिनांक ०२/०१/२०१९ रोजी १६.५८ वा. ससुन पास केंद्र, ससुन हॉस्पिटल, पुणे येथे तडजोडीअंती लाच रक्कम ५००/- रु. चा स्विकार करुन गुन्हेगारी स्वरुपाचे वर्तन केले म्हणुन माझी त्याचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ भ्रष्टाचार प्रतिबंधक (सुधारित सन २०१८) अधिनियम कलम ७ प्रमाणे फिर्याद आहे.

अर्चना दौंडकर
पोलीस निरीक्षक
अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे

Scanned by CamScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास

(4) Transferred to P.S.(गुन्हा District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14. Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार
बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाम): MAHAMAD HANIF MAHAMAD YUNUS
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): DGPMMMM6505

ASI

ठाणे अंमलदार
बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे



Scanned by CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**

(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ | Build (बांधा) | Height(cms.) (उंची(सें.मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities (व्यंग/वैशिष्टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणाऱ्याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**

Scanned by CamScanner